आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

३०ऑक्टोबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाविकास आघाडीत जागावाटपावरून कोणताही वाद नसून कुठंही मैत्रिपूर्ण लढत होणार नसल्याचं काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांचं प्रतिपादन

- विधानसभा निवडणुकीनंतर महायुतीसोबत जाण्याचे मनसेप्रमुख राज ठाकरे यांचे स्पष्ट संकेत

- विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांची छाननी/ अर्ज मागं घेण्यासाठी ४ नोव्हेंबरपर्यंत मुदत

- राज्य शिक्षण मंडळाच्या बारावीच्या परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ४२७ अंकांची घसरण

**<><><><><>**

महाविकास आघाडीत जागा वाटपावरून कोणताही वाद राहिला नसून. कोणत्याही मतदार संघात मैत्रिपूर्ण लढत होणार नाही, असा ठाम विश्वास काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी व्यक्त केला आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. ज्या मतदारसंघात मित्रपक्षांनी अर्ज दाखल केले आहेत ते दोन दिवसात चर्चा करुन मागे घेतले जातील. समाजवादी पक्षाशी सुद्धा चर्चा सुरु असून त्यावरही लवकरच निर्णय होईल, असं त्यांनी सांगितलं.

महायुतीत एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या जागांवरही भाजपानंच उमेदवार दिले असून या दोन्ही पक्षांना संपवण्याची ही भाजपाची  सुरुवात आहे,

अशी टीका त्यांनी केली. महायुती सरकारला घालवण्याचा निर्धार जनतेनं केला आहे. त्यामुळे आता हे सरकार जाऊन जनतेच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणारं महाविकास आघाडीचं सरकार येईल, असा विश्वास चेन्नीथला यांनी व्यक्त केला.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी येत्या ६ नोव्हेंबरला महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत. सकाळी नागपूर इथं संविधान सन्मान संमेलन आयोजित केलं असून, संध्याकाळी मुंबईत बीकेसीमध्ये महाविकास आघाडीची गॅरंटी जाहीर केली जाणार आहे. या कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते शरद पवार, आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यावेळी दिली. महायुती सरकारनं धनगर समाजाची फसवणूक केल्याचा आरोप करत भाजपाच्या उपाध्यक्ष डॉ. अर्चना पाटील यांनी यावेळी काँग्रेसमधे प्रवेश केला.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचंच सरकार येईल आणि मनसे या सरकारचा भाग असेल असा विश्वास मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी आज एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बोलताना व्यक्त केला. राज्यात महाविकास आघाडीचं सरकार येईल, असं तीन महिन्यांपूर्वी वाटत होतं, मात्र हरियाणाच्या निवडणुकीनंतर चित्र बदललं आहे. आपल्या साथीनं भाजपाचा मुख्यमंत्री होईल, असं राज ठाकरे म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या २८८ विधानसभा मतदारसंघातल्या निवडणुकीसाठी विविध पक्षांच्या आणि अपक्ष अशा ७ हजार ९९५ उमेदवारांनी दहा हजार ९०५ अर्ज

दाखल केले आहेत. या अर्जांची छाननी आज पूर्ण होईल. त्यानंतर चार नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येतील. २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे, तर २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर होतील.

**<><><><><>**

**धुळे** जिल्ह्यातल्या पाच विधानसभा मतदारसंघात दाखल केलेल्या ११५ उमेदवारी अर्जांपैकी १३ अर्ज अवैध ठरले आहेत. राज्यातल्या दोन्ही आघाड्यांच्या उमेदवारांशिवाय अनेक महत्वाच्या अपक्ष उमेदवारांनी निवडणुकीसाठी अर्ज दाखल केले आहेत. त्यापैकी सर्वांचे अर्ज वैध ठरले आहेत. ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येतील.

**बीड** जिल्ह्यातल्या सहा मतदारसंघातल्या एकूण ३३ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले असून ३७७ उमेदवारांचे ५०६ अर्ज वैध ठरले आहेत.

**सांगली** जिल्ह्यातल्या आठ विधानसभा मतदारसंघासाठी २३६ अर्ज दाखल झाले होते. यातले २१० अर्ज वैध ठरले आहेत. त्यामुळे सांगली जिल्ह्यात सध्या १८४ उमेदवार रिंगणात आहेत.

**छत्रपती संभाजीनगर** जिल्ह्यातल्या ९ विधानसभा मतदार संघासाठी ४३७ उमेदवारांनी ६१३ अर्ज दाखल केले होते. यातले ३९८ उमेदवारांचे ५२२ अर्ज वैध ठरले आहेत.

**सोलापूर** जिल्ह्यातल्या अकरा मतदारसंघासाठी ३८४  उमेदवारांनी ४८३ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. यातल्या ३३५ उमेदवारांचे ४०७ अर्ज वैध ठरले आहेत.

**नांदेड** जिल्ह्यातल्या ९ मतदारसंघासाठी ५५ अर्ज अवैध ठरले असून ४६० अर्ज वैध ठरले आहेत. तर लोकसभा निवडणुकीसाठीचे ३९ अर्ज वैध ठरल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली आहे.

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाल्यानंतर कालपर्यंत आलेल्या तक्रारींपैकी ९९ टक्क्यापेक्षा जास्त तक्रारी निवडणूक आयोगानं निकाली काढल्या आहेत. १५ ते २९ ऑक्टोबरपर्यंत सी-व्हिजिल ॲपवर एकूण १ हजार ६४८ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यातल्या १ हजार ६४६ तक्रारी निकाली काढल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली.

सी-व्हिजिल ॲपद्वारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथक चौकशी करुन योग्य ती कारवाई करता येईल.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **जालना आणि बीड** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं, फेब्रुवारी-मार्चमध्ये घेतल्या जाणाऱ्या बारावीच्या परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ दिली

आहे. ही मुदत आजपर्यंत होती. आता ३१ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत नियमित शुल्कासह, तर १५ ते २२ नोव्हेंबर या कालावधीत विलंब शुल्कासह अर्ज भरता येणार आहे.

अर्ज भरण्याची मुदत संपल्यावर शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या आणि प्रीलिस्ट २७ नोव्हेंबरपर्यंत विभागीय मंडळाकडे जमा करायच्या असल्याचं मंडळाच्या प्रसिद्धिपत्रकात स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजारात आज दिवसभर चढ-उताराचं वातावरण राहिलं. बाजार बंद होताना शेअर बाजाराचा सेन्सेक्स ४२७ अंकांनी घसरला आणि ७९ हजार ९४२ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १२६ अंकांची घसरण नोंदवत २४हजार ३४१ अंकांवर बंद झाला.

ग्राहकोपयोगी वस्तू वगळता, आज बहुतेक सर्वच क्षेत्रांच्या समभागांनी घसरण नोंदवली. बँकिंग, फार्मा आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे समभाग आज सर्वात जास्त दबावाखाली दिसून आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिवाळीच्या पूर्वसंध्येला भारतासह जगभरात वसलेल्या देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. दिवाळी हा आनंदाचा आणि उत्साहाचा सण आहे. हा सण म्हणजे अज्ञानावर ज्ञान आणि वाईटावर चांगल्यानं मिळवलेल्या विजयाचे प्रतीक असून, तो आपल्याला उज्ज्वल भविष्यासाठी उमेद देतो, दिवाळीचा सण म्हणजे वंचित आणि गरजूंना मदत करण्याची संधी आहे असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

सर्वांनी प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करत, निरोगी, समृद्ध आणि जबाबदार समाज घडवण्याचा संकल्प करू या असं आवाहनही राष्ट्रपतींनी आपल्या संदेशातून केलं आहे.

**<><><><><>**

दिवाळीच्या पूर्वसंध्येला आज अयोध्येमध्ये भव्य दीपोत्सव आयोजित करण्यात आला आहे. राम मंदिराच्या उभारणी नंतर अयोध्येतला हा पहिलाच दीपोत्सव आहे. ‘राम की पाडी’ सह, अयोध्येतल्या ५५ घाटांवर २५ लाखांपेक्षा जास्त दिवे प्रज्वलित करून, गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड नोंदवण्याचं उत्तरप्रदेश सरकारचं उद्दिष्ट आहे. शरयू नदीच्या घाटावर आज ११ शे बटुक आणि १५७ साधू एकत्रितपणे महा आरती करून आणखी एक विक्रम नोंदवणार आहेत. या दीपोत्सवाचं निरीक्षण करण्यासाठी गिनीज बुकचं पथकही अयोध्येत उपस्थित आहे.

**<><><><><>**

तेराव्या झेंग्झू आंतरराष्ट्रीय शाओलिन वुशू महोत्सवात अहिल्यानगरची खेळाडू नयना खेडकर हिनं भारताचं प्रतिनिधित्व करत कुंग फू मध्ये रौप्य पदक पटकावलं आहे. चीनच्या हेनान प्रांतातल्या झेंगझोऊ या शहरामध्ये झालेल्या या स्पर्धेत छप्पन्न देशातल्या विविध वयोगटातल्या अडीच हजारहून जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी संभाजी ब्रिगेडनं सात उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. हे सर्व उमेदवार पुणे जिल्ह्यातले आहेत. लोकसभा निवडणुकीत संभाजी ब्रिगेडनं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला पाठिंबा दिला होता. विधानसभा निवडणुकीसाठी संभाजी ब्रिगेडसाठी काही जागा सोडाव्यात अशी मागणी ठाकरे पक्षाकडे केली होती. ही मागणी पूर्ण न झाल्यानं महाविकास आघाडीचा पाठिंबा काढून घेत निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय संभाजी ब्रिगेडनं घेतला आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केलेल्या नाकेबंदीदरम्यान दादरा नगर हवेली इथून महाराष्ट्रात येणाऱ्या चारचाकीतून चार कोटी २५ लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. चारचाकी पोलिसांनी ताब्यात घेतली असून ही रक्कम कुठे नेली जात होती, याची चौकशी केली जात आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीमध्ये मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी धाराशिव जिल्हा निवडणूक प्रशासनानं हाती घेतलेल्या उपक्रमांचा भाग म्हणून, आज शालेय विद्यार्थ्यांनी शहरातून सायकल रॅली काढली.

**<><><><><>**

मुंबई विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय संबंध आणि सामरिक अध्ययन केंद्राच्या वतीनं आयोजित हिंद महासागर क्षेत्रातली  आव्हानं आणि संधी या विषयावरच्या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिसंवादाचं आयोजन केलं गेलं होतं. या परिसंवादात

भारतातल्या ३०० पेक्षा जास्त विद्यार्थी आणि शोधनिबंधकांसह, बांग्लादेश, लाओस, तैवान आणि नॉर्वेचे प्रतिनिधीही सहभागी झाले होते.

**<><><><><>**

मराठवाडा आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी, मध्य महाराष्टात काही ठिकाणी, तर कोकणात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे.

तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी आणि कोकणात काही ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली आहे.

येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**